**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्र. : २२०२९३८८
ईमेल: dir१.mev-mh@nic.in
संकेतस्थळ:http://mczma.gov.in

क्र. एमसीझेडएमए २०२०/ प्र.क्र. २ / तां.क. ४
महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण यांचे
कार्यालय, पर्यावरण विभाग,
१५ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. १६.०१.२०२०

प्रति,

१) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३ रा व ४ था मजला, पीव्हीआर थिएटर समोर , सायन सर्कल, मुंबई-४०० ०२२
२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुख्यालय, मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस ४०००01
३) जिल्हाधिकारी मुंबई शहर, जुने कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई – ४०००01
४) जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, १० वा मजला, प्रशासकीय इमारत, चेतना कॉलेज जवळ, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

**विषय :** **मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्याचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांवर (CZMPs) सुचना व हरकती मागविणे व जनसुनावणी घेणेबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मला आपणास कळविण्याचे आदेश आहेत की, केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि.१८ जानेवारी, २०१९ रोजी नवीन सिआरझेड अधिसुचना, २०१९ जाहीर केली. सदर अधिसुचनेच्या तरतूदींनुसार केंद्र शासन प्राधिकृत संस्थेमार्फत सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे अदयावत/ तयार करणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने, सदर काम राज्य शासनाने नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट,चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेस दिले आहे. नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट,चेन्नई या संस्थेने मुंबई शहर व मुंबई उपनगरीय जिल्हाचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे,२०१९ तयार करण्याचे काम पूर्ण केले आहे. सदर प्रारुप आरखड्यांबाबत महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि. ३१.१२.२०१९ रोजीच्या १४२ व्या बैठकीत चर्चा होऊन सदर नकाशे प्रसिध्द करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

त्याअनुषंगाने, सीआरझेड अधिसूचना, २०१९ मधील परिशिष्ट IV, परिच्छेद ६ नुसार, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्राचे उक्त प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे हे पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ नुसार सर्व जनतेच्या सूचना / हरकतीसाठी आमंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. आपणास विनंती करण्यात येते की, उक्त प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMP) आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे. हे प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या आत इंग्रजी / मराठी भाषेत लेखी काही सूचना / हरकती असल्यास, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई; संबधित जिल्हाधिकारी कार्यालय; संबधित प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ येथे नोंदवु शकतात व ४५ व्या दिवसानंतर कोणतीही सूचना / हरकत स्वीकारली जाणार नाही. तद्नंतर संबंधित जिल्हाधिकारी व प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ जिल्हास्तरावर जन सुनावणीचे घेतील. तद्नंतर संबंधित जिल्हाधिकारी व प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी जिल्हास्तरावर जन सुनावणी घेण्यात यावी व तात्काळ अहवाल सादर करण्यात यावा.

आपला,

(संजय संदानशिव)
अवर सचिव, पर्यावरण

प्रत माहितीस्तव अग्रेषित:-

१) प्रधान सचिव पर्यावरण तथा अध्यक्ष, एमसीझेडएमए, मंत्रालय, मुंबई
२) संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, एमसीझेडएमए मंत्रालय, मुंबई
३) निवड नस्ती / तां.क. ४